# महाराष्ट्र शासन

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ८९ /आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक- २१ एप्रिल २०२०

प्रति,

महानगरपालिका आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

विषय: **केंद्र सरकारकडून विकसीत करण्यात आलेले आरोग्य सेतू ॲप वापरण्याच्या सूचना निर्गमित करणेबाबत.**

भारत सरकारने कोविड-१९ ची माहिती सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करुन देण्यासाठी ॲन्ड्रॉईड व आओएस प्रणाली धारक भ्रमणध्वनी धारकांसाठी बहूभाषिक (एकूण ११ भांषांमध्ये उपलब्ध) आरोग्य सेतू ॲप विकसित केले आहे. या ॲपची सर्वसाधारण वैशिष्टये खालीलप्रमाणे आहे-

- हे ॲप ब्ल्युटुथ टेक्नॉलॉजीवर आधारीत आहे. याद्वारे कोविड-१९ बाधीत रुग्णांच्या भ्रमध्वनी क्रमांकाच्या संकलित माहितीच्या आधारे जी.पी.एस. टेक्नॉलॉजीद्वारे कोविड बाधीत रुग्ण आस-पास आल्यास (साधारणत: सहा फुटाच्या अंतरावर) वापरकर्त्यास धोक्याची सूचना देते.
- या ॲप मध्ये कोविड-१९ बाधेची स्व: चाचणी सुविधा, प्रतिबंधात्मक उपायोजना, सामजिक अंतर बाळगणे व प्रतिबंधासाठी काय करावे किंवा काय करुन नये याबाबतची प्रमाणित माहिती वापरकर्त्यास मिळते.
- स्व: चाचणीमध्ये वापरकर्ता अति धोकादायक स्थितीत आढळल्यास या ॲपद्वारे जवळच्या कोविड तपासणी केंद्राचा क्रमांक उपलब्ध करुन दिला जातो. अथवा तात्काळ १०७५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करण्याबाबत वापरकर्त्यास या ॲपद्वारे सुचविण्यात येते.
- या ॲप द्वारे कोविड-१९ बाधेच्या अनुषंगाने वापरकर्त्याच्या सर्वसाधारण प्रश्नांची प्रमाणित उत्तरे दिली जातात. तसेच, सर्व राज्यातील हेल्प लाईन क्रमांक उपलब्ध करुन दिले जातात.
- या ॲप द्वारे लॉक डाऊन काळात वापरकर्त्यास अपरिहार्य परिस्थितीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची आवश्यकता भासल्यास ई-पास द्वारे अर्ज करुन पास मिळविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

हे ॲप खालीलप्रमाणे डाऊनलोड करण्याची सुविधा आहे.
**ios : itms-apps://itunes.apple.com/app/id505825357**
**Android : https://play.google.com/store/appes/details?id=nic.goi.arogyasetu**

हे ॲप कोविड-१९ बाधीत रुग्णांचे संकलित केलेल्या भ्रमणध्वनी वापरकर्त्याच्या कक्षेत आल्यानंतर धोक्याची सूचना देत असल्याने, आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रातील सर्व कोविड-१९ बाधीत रुग्ण, संशयीत रुग्ण, विलगीकरण व अलगीकरण असलेल्या तसेच रुग्णालयातून उपचारअंती सोडून देण्यात आलेले सर्व नागरीकांचे भ्रमणध्वनी क्रमांक संकलित करावे.

सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांचे अधिकार क्षेत्रामध्ये कोविड-१९ बाधीत रुग्ण, विलगीकरण कक्षातील सर्व रुग्ण, संस्थामध्ये अलगीकरण करण्यात आलेले सर्व संशयीत बाधीत रुग्ण, रुग्णालयातून डिस्चार्च मिळालेले बाधा मुक्त नागरीक या सर्वांना तसेच, आरोग्य सेवा देणारे डॉक्टर्स, परिचारीका व इतर आरोग्य कर्मचारी यांनाही जनहितार्थ हे ॲप डाऊनलोड करुन त्याचा वापर करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात व सर्व सामान्य जनतेला सदर ॲपचा वापर करण्याबाबत आवाहन करण्यात यावे.

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

प्रत

अपर मुख्य सचिव, महसूल व ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव, मा. मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त आरोग्य सेवा, मुंबई.
संचालक आरोग्य सेवा, १/२
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई

प्रत, माहीतीस्तव.

मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव